# कै. (सौ.) सुजाता देवदत्त कुलकर्णी यांचे शेवटचे आजारपण आणि मृत्यू

## विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 मनोगत ७

卐 साधनेची तळमळ, परात्पर गुरु डॉक्टरांवर अनन्य निष्ठा या गुणांद्वारे ६१ टक्के आध्यात्मिक पातळी प्राप्त करून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त झालेल्या रामनाथी आश्रमातील दिवंगत साधिका सौ. सुजाता कुलकर्णी! ८


---

## अनुक्रमणिका


१. सौ. कुलकर्णी रुग्णाईत होणे १०

२. सौ. कुलकर्णी यांच्या मृत्यूपूर्वी १ मासापासून मृत्यूपर्यंत घडलेला आध्यात्मिक घटनाक्रम १६

३. सौ. कुलकर्णी यांच्या मृत्यूनंतर केलेले सूक्ष्म-परीक्षण ७१

४. सौ. कुलकर्णी यांच्या मृत्यूदिनाच्या बेरजेचे अंकशास्त्रानुसार वैशिष्ट्य ९०

५. सौ. कुलकर्णी यांच्या शेवटच्या आजारपणाच्या काळात त्यांची मुलगी कु. तृप्ती हिला आलेल्या अनुभवांची दैनिक ‘सनातन प्रभात’मध्ये प्रसिद्ध झालेली लेखमाला वाचून त्यांचे नातेवाईक, साधक आणि संत यांनी व्यक्त केलेले विचार ! ९०

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ९६



**सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !**

卐 विज्ञानयुगातील वाचकांना समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी) ज्ञान !

卐 तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

卐 अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !

## मनोगत

'अंबरनाथ, जि. ठाणे येथील श्री. देवदत्त कुलकर्णी, त्यांच्या पत्नी सौ. सुजाता आणि त्यांची कन्या कु. तृप्ती असे सर्व कुलकर्णी कुटुंबीय गेली अनेक वर्षे सनातनच्या मार्गदर्शनानुसार साधना करत आहेत. गेली १० वर्षे ते घरदार सोडून सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात येऊन राहिले. त्यामुळे त्यांचा नातेवाइकांशी विशेष संबंध उरला नाही. अशा स्थितीत सौ. सुजाता कुलकर्णी एप्रिल २०१९ पासून गंभीर आजाराने पीडित होत्या. या आजारातच २०.४.२०२० या दिवशी त्यांचा मृत्यू झाला. तशातच २२.३.२०२० पासून 'कोरोना' महामारीमुळे देशभरात दळणवळण बंदी होती. एकूणच कुलकर्णी कुटुंबियांसाठी हा आपत्काळच ठरला. 'सौ. कुलकर्णी यांच्या शेवटच्या गंभीर आजाराला कुलकर्णी कुटुंबियांनी आणि नंतर सौ. कुलकर्णी यांच्या मृत्यूला श्री. कुलकर्णी आणि त्यांच्या एकुलत्या एक मुलीने आश्रमातील साधकांच्या आणि साधनेच्या साहाय्याने धैर्याने तोंड कसे दिले ?', याची माहिती या ग्रंथात दिली आहे. कुटुंबीय साधक असले की, शेवटचे गंभीर आजारपण अन् मृत्यू यांसारख्या कठीण प्रसंगांना खंबीरपणे तोंड कसे देता येते, याचे आदर्श उदाहरण या निमित्ताने पहायला मिळते. (प्रस्तुत ग्रंथमालिकेतील 'सौ. सुजाता कुलकर्णी यांचे साधनापूर्व खडतर जीवन आणि साधनाप्रवास' अन् 'सौ. सुजाता कुलकर्णी यांचे मृत्यूनंतरचे विधी' हे अन्य २ ग्रंथही प्रकाशित झाले आहेत.)

वर्ष २०२१ पासून सर्वांनाच भीषण आपत्काळाला तोंड द्यावे लागणार आहे. त्या वेळी नैसर्गिक आपत्ती, महायुद्ध इत्यादींमुळे मोठ्या प्रमाणावर नरसंहार होऊ शकतो. अशा वेळी 'जवळच्या व्यक्तींचा मृत्यू कसा सहन करायचा ? साधना केल्यास मृत्यूसारख्या कठीण प्रसंगी देव कसे साहाय्य करतो ?', हे या ग्रंथातून शिकायला मिळेल. परीक्षा असली की, आपण त्या विषयाचा अभ्यास करतो. तसे आता येणारा तिसऱ्या महायुद्धाचा भीषण काळ, ही सर्वांसाठीच मोठी परीक्षा आहे. या परीक्षेच्या सिद्धतेसाठी हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल.

'या ग्रंथाच्या अभ्यासाने सर्वांनाच आपत्काळाला तोंड देण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकता यावे', ही भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना !'

– (परात्पर गुरु) डॉ. आठवले (२७.४.२०२०)